पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ८०

<u>सभावृत्तांत</u>

दिनांक - ०१/१०/२०१३ वेळ - सकाळी ११.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ०१/१०/२०१३ रोजी सकाळी ११.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा.छाया जगन्नाथ साबळे
५) मा.जगदीश शेट्टी
६) मा.भालेकर अरुणा दिलीप
७) मा.वाघेरे सुनिता राजेश
८) मा.महेशदादा किसन लांडगे
९) मा.बारणे माया संतोष
१०) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
११) मा.लोंढे गणेश नारायण
१२) मा.कदम सदगुरु महादेव
१३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१४) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.श्रीकर परदेशी – मा.आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.माछरे – सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.डॉ.देशमुख – वैद्यकिय अधिक्षक, मा.निकम, मा.काची, मा.रामदास जाधव, मा.चव्हाण, मा.शरद जाधव, मा.कपिले, मा.थोरात, मा.चिंचवडे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.सैय्यद, मा.बरशेट्टी, मा.गबाले - कार्यकारी अभियंता, मा.उबाळे – प्रशा.अधिकारी ( शिक्षणमंडळ),मा.कांबळे – प्रभारी शिक्षणाधिकारी(माध्य), मा.पाटील – प्राचार्य आयटीआय, मोरवाडी, मा.चव्हाण – आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पोमण – संगणक अधिकारी, मा.पवार – कायदा सल्लागार, शिंपी – नगररचनाकार, मा.इंदलकर – जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**-------**

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्र.४१) अंदाजपत्रकात वाढ घट करणेबाबत..मा.सुनिता वाघेरे,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४२) तरतुद वर्ग करणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४३) सन २०१३ - १४ च्या अर्थसंकल्पातील अ प्रभाग व अ मुख्यालयातील कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करणेबाबत..मा.सुनिता वाघेरे,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४४) सन २०१३ - १४ चे अंदाजपत्रक तरतुद वर्ग करणेबाबत..मा.सुनिता वाघेरे, मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४५) मनपाचे सन २०१३ - १४ चे मनपा अंदाजपत्रकात वाढ घट करणेबाबत.. मा.सुनिता वाघेरे,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४६) नागरी सुविधा केंद्र सुरु करणेबाबत..

विषय क्र.४७) सन २०१३ - १४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत.. मा.सुनिता वाघेरे,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४८) सन २०१३ - १४ च्या अर्थसंकल्पातील ब प्रभागातील कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव...

विषय क्र.४९) विविध कार्यक्रमांचे व्हिडीओ शुटींग करणेकामी आलेल्या खर्चास मान्यता देणेबाबत..

विषय क्र.५०) सन २०१३ - १४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.५१) समुहसंघटकाचे मुदतवाढीबाबत..

विषय क्र.५२) सन २०१३ - १४ चे अंदाजपत्रक तरतुद वर्ग ठरावात दुरुस्ती करणेबाबत.. मा.शकुंतला धराडे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.५३) ***JnNURM*** अंतर्गत मनपाचे आरोग्य विभागाच्या वापराकरीता ८ टन क्षमतेचे ४ नग टिपर यंत्रणा खरेदी करणेबाबत.

------------

अ) दिनांक १७/९/२०१३ व २१/९/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - ७८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक २४/९/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - ७९ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ४१९१ | विषय क्रमांक – १ |
| दिनांक – १/१०/२०१३ | विभाग – स्थापत्य |
| सुचक – मा.आशा शेंडगे | अनुमोदक – मा.संगिता भोंडवे |

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/२३७/२०१३दि.३०/७/२०१३

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधिल अ.क्र.१ अन्वये, स.नं.१० सांगवी येथील संत गोरा कुंभार उद्यानाचे नुतनीकरण करणे कामी मे.रिगल कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.१५,८६,९१६/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख शहाऐंशी हजार नऊशे सोळा) पेक्षा १५.०० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१४,१६,३२३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे

बाजारभाव कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१९२ विषय क्रमांक – २
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.विमुका/४/कावि/४३७/२०१३दि.३/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१७/२०१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, जलशुध्दीकरण केंद्र से.२३ टप्पा-३ व ४ मध्ये प्रकाश व्यवस्था व विद्युत विषयक कामे करणेकामी मे.एम.बी.इलेक्ट्रीक & कंपनी (नि.र.रु.३२,७७,०२९/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख सत्याहत्तर हजार एकोणतीस) पेक्षा (सुधारीत दर) १२.३५ % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१९३ विषय क्रमांक – ३
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – वाहनदुरुस्ती कार्यशाळा
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.काशा/०४/कावि/४९६/२०१३दि.६/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे वापरासाठी खरेदी करणेत येणारे रोड स्विपर मशिन मे.बी.व्ही.जी.इंडीया लि., चिंचवड, पुणे-१९. यांचे निविदेतील भाग-०२ कामामधील दर सर्वात कमी असल्याने त्यांचेकडून एकत्रितपणे करारनामा करून घेऊन सदर मशिन चालनाकरिता प्रति दिन प्रति शिफ्ट र.रू.९,२२५/- (र.रू.नऊ हजार दोनशे पंचवीस) अधिक वेळोवेळी होणा-या बदलानुसार येणारे सेवाकर याप्रमाणे येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१९४ विषय क्रमांक – ४
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – औद्योगिक प्रशिक्षण संस्था
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जा. क्र.औप्रसं/४/कावि/७३४/२०१३दि.२/८/२०१३

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी कडील सन २०१२-१३ च्या सुधारित अंदाजपत्रकात बोनस तथा सानुग्रह अनुदान ह्या लेखाशिर्षावर र.रू.९०,०००/- (र.रू.नव्वद हजार) कमी घेणेत आली असल्याने तरतूदी मध्ये तफावत दिसत असून सुधारित तरतूदी पेक्षा र.रू.८४,१८९/- इतका जादा खर्च झालेला आहे. सदरची तफावत दुरुस्त करणेकामी स्थायी आस्थापनेवर दिनांक २०/३/२०१३ रोजी एकूण र.रू.२,०६,४८८/- शिल्लक

आहे. सदर रकमेतून र.रू.९०,०००/- फक्त सन २०१२-१३ च्या बोनस तथा सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१९५ | विषय क्रमांक – ५
दिनांक – १/१०/२०१३ | विभाग – मुख्य लेखा परिक्षक
सुचक – मा.छाया साबळे | अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा. क्र.मुलेप/१/कावि/७०/२०१३दि.१२/८/२०१३

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.८.०७.२०१३ ते १४.०७.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७०/२०१३ दि.१२.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१९६ | विषय क्रमांक – ६
दिनांक – १/१०/२०१३ | विभाग – मुख्य लेखा परिक्षक
सुचक – मा.विनया तापकीर | अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे जा. क्र.मुलेप/१/कावि/७१/२०१३दि.१२/८/२०१३

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१५.०७.२०१३ ते २१.०७.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७१/२०१३ दि.१२.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१९७ | विषय क्रमांक – ७
दिनांक – १/१०/२०१३ | विभाग – मुख्य लेखा परिक्षक
सुचक – मा.माया बारणे | अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे जा. क्र.मुलेप/१/कावि/७२/२०१३दि.१२/८/२०१३

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२२.०७.२०१३ ते २८.०७.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७२/२०१३ दि.१२.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१९८ विषय क्रमांक – ८
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – क्रीडा
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.क्रीडा/३/कावि/२७१/२०१३दि.१७/७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा क्रिडा विभागाकडील तक्ता क्रमांक १ मधील २ संस्था अनुदान अदा करणेस पात्र झाल्या होत्या. तसेच लेखापाल यांनी प्रस्तावात नमूद १ ते १४ सार्व. संस्थांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही असे कळविले असल्याने अपात्र ठरलेल्या आहेत त्यानुसार सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात नोंदणीकृत सार्व संस्था / मंडळे यांना अनुदान अदा करणेकामी खालील नमुद तक्ता क्र.१ मधील-

| अ.क्र. | सार्व.संस्था/मंडळांचे नांव | अनुदान र.रू. |
|---|---|---|
| १ | साई संस्कार संस्था, आकुर्डी | १,८९,२५२/- |
| २ | सुकन्या मेडीकल फाऊंडेशन, राजनगर, से.नं.२२, निगडी ओटा स्कीम, निगडी, पुणे-४४. | ७,२४७/- |

या अ.क्र.१ ते २ सार्व. संस्था मंडळांना त्यांचे नांवापुढे नमूद केलेप्रमाणे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात मा. आयुक्त यांच्या दि.२३/०१/२०१३ व ३०/०३/२०१२ मंजूर प्रस्तावान्वये अनुदान अदा करणेस मान्यता दिल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१९९ विषय क्रमांक – ९
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – वैद्यकिय मुख्य
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वैद्य/१/कावि/८२९/२०१३दि.५/९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागांतर्गत रहाटणी येथे दवाखाना (प्राथमिकआरोग्यकेंद्र) कार्यरत असून तेथील रुग्ण संख्या महानगरपालिकेच्या इतर दवाखान्यांच्या तुलनेत खूपच कमी आहे तसेच सदर परिसरातील रुग्णसेवेसाठी पिंपळेसौदागर दवाखाना व जिजामाता रुग्णालय हे रहाटणी दवाखान्याच्या जागेपासून जवळ असल्याने रहाटणी दवाखाना बंद करुन महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या पुनावळे येथे नवीन दवाखाना सुरु करणेबाबत तसेच रहाटणी येथे सध्या कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना बदलीद्वारे पुनावळे दवाखान्या मध्ये नेमणूक करणेस मा.आयुक्त यांनी सूचीत केलेले आहे. पुनावळे दवाखान्यासाठी पुनावळे येथील महानगरपालिका शाळेतील चार खोल्या वैद्यकीय विभागाच्या ताब्यात मिळालेल्या आहेत. तसेच तेथील स्थापत्य विषयक कामे स्थापत्य विभागाकडून पूर्ण करणेत आलेली आहे. त्यानुसार पुनावळे दवाखाना लवकर सुरु करणे शक्य होईल. तरी रहाटणी दवाखाना बंद करुन पुनावळे येथे नव्याने दवाखाना सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२०० विषय क्रमांक – १०
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.जशुके/वि/४/६०/२०१३दि.२७/८/२०१३
विषय :- तरतुद वर्ग करणेबाबत..

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२०१ विषय क्रमांक – ११
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – ड प्रभाग विद्युत
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.डप्र/वि/१/कावि/४७४/२०१३दि.३१/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत ड प्रभाग कार्यक्षेत्रातील चालु पुर्ण तथापी मनपा अंदाजपत्रक सन १३-१४ मध्ये समाविष्ठ असलेल्या लेखाशिर्षानिहाय कामांसाठी विभागातंर्गत प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे तरतुद र.रु.९३ लक्ष वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२०२ विषय क्रमांक – १२
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – जलनि:सारण
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.जनि/२/कावि/६९९/२०१३दि.१६/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.१/१०/२०१३-१४ मधील अ.क्र.४ अन्वये, सन २०१३-१४ करीता मनपाचे भुगयो अंतर्गत पिंपळे सौंदागर व काळेवाडी येथील पंप हाऊसचे वार्षिक चालन देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.फ्लोमॅक इंजिनिअरींग कॉर्पोरेशन (नि.र.रू.२८,४३,१८४/- पेक्षा ०.१० % कमी) या दराने ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२०३ विषय क्रमांक – १३
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा. क्र.मुलेप/१/कावि/९९०/२०१३दि.१६/८/२०१३

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२०४ विषय क्रमांक – १४
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/८२/२०१३दि.१९/९/२०१३

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे ऑगस्ट २०१३ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२०५ विषय क्रमांक – १५

दिनांक – १/१०/२०१३ विभाग – मुख्यलेखापरिक्षक

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/८३/२०१३दि.१९/९/२०१३

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१९.८.२०१३ ते दि.२५.८.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/८३/२०१३ दि.१९.९.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२०६ विषय क्रमांक – १६

दिनांक – १/१०/२०१३ विभाग – मुख्य लेखा परिक्षक

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा. मुख्यलेखापरिक्षक यांचे जा. क्र.मुलेप/१/कावि/८४/२०१३दि.१९/०९/२०१३

मा. मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२६.८.२०१३ ते दि.१.९.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/८४/२०१३ दि.१९.९.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२०७ विषय क्रमांक – १७

दिनांक – १/१०/२०१३ विभाग – मुख्य लेखा परिक्षक

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा. मुख्यलेखापरिक्षक यांचे जा. क्र.मुलेप/१/कावि/८५/२०१३दि.१९/०९/२०१३

मा. मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२.९.२०१३ ते दि.८.९.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/८५/२०१३ दि.१९.९.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२०८ विषय क्रमांक – १८

दिनांक – १/१०/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/०४/कावि/८३५/२०१३दि.१९/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

करसंकलन विभागासाठी मिळकत फेरसर्व्हेक्षण २०१३ कामकाजासाठी माहिती पुस्तिका छपाई मे. आशिष एंटरप्रायजेस, चिंचवड यांचेकडुन प्रती पुस्तिका २२.५० प्रमाणे र.रु.६,७५०/- व मे भारती एंटरप्रायजेस

यांचेकडुन कोटेशन नोटीस सु. क्र. ११/२०१३-१४ नुसार स्टेशनरी साहित्य खरेदीकामी र.रु.३२,४१५/- असा एकुण र.रु.३९,१६५/- खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२०९ विषय क्रमांक – १९
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/०४/कावि/८३०/२०१३दि.१९/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सहा.आयुक्त परवाना यांचेकडील दि.१३/०९/२०१३ चे पत्रान्वये प्राप्त ई मेल द्वारे मे.मेडीया आयडीया, पुणे यांचेकडुन मनपाने सुरु केलेल्या सारथी हेल्पलाईनचे शहरातील नागरिकांना महानगरपालिकेच्या कामकाजाबददल अधिक माहिती देण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी सुरु करावयाचे हेल्पलाईनचे फ्लेक्स ७० नग प्रती नग र.रु.६,७२०/- याप्रमाणे मे. मेडीया आयडीया, पुणे यांचेकडुन छपाईकामी आलेल्या एकुण खर्च र.रु.४,७०,४००/- व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२१० विषय क्रमांक – २०
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/०४/कावि/८२७/२०१३दि.१९/९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे उद्यान विभागाकडील प्रवेश तिकिटे मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचेकडुन छपाई करुन घेणेस व त्याकामी येणारा एकुण खर्च र.रु.२,३५,२००/- तसेच यापुर्वीची मनपाचे दुर्गादेवी उद्यानाचे प्रवेश तिकिटे छपाई र.रु.१,१७,६००/- असे एकुण र.रु.३,५२,८००/- चे खर्चास व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२११ विषय क्रमांक – २१
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – आरोग्य मुख्य
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/४/कावि/४९६/२०१३दि.१३/९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा इमारतीची साफसफाई व स्वच्छता करणे कामाची निविदा प्रक्रिया चालु असून प्रक्रिया पूर्ण होणेस काही कालावधी लागणार आहे त्यामुळे आरोग्याच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने इमारतीची दैंनदिन साफसफाई व स्वच्छता ठेवणे आवश्यक असल्याने दिनांक ३०/६/२०१३ चे प्रस्तावान्वये ३ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता दिली आहे त्यानूसार मे बी.व्ही.जी.इंडिया लिमिटेड यांना पुर्वीच्या मान्य दरानूसार प्रति महिना र.रु.४,६८,३९६/- याप्रमाणे दिनांक १/७/२०१३ ते ३०/९/२०१३ पर्यत ३ महिने कालावधासाठी करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२१२ विषय क्रमांक – २२
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – आरोग्य मुख्य
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जा. क्र.आमुकां/४/कावि/४९७/२०१३दि.१९/९/२०१३

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या आरोग्य मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१३-१४ अन्वये, मनपा इमारतीमधील सर्व कार्यालये, जकात विभागाचे फुगेवाडी कोठार, काशीबा शिंदे सभागृह, पिंपरी कोठार, डांगे सांस्कृतिक हॉल, थेरगांव कोठार, भैरवनाथ मंदिर, पिंपरीगांव कोठार, क प्रभाग कार्यालय कोठार, अ, ब, क, ड प्रभाग कार्यालये संत तुकाराम व्यापार संकुलन, हेगडेवार भवन इत्यादी ठिकाणी पेस्ट कंन्ट्रोल करणेकामी मे.ओम पेस्ट कंन्ट्रोल सर्व्हीसेस (नि.र.रु.६,८५,३९६/- (र.रु.सहा लाख पंच्याऐंशी हजार तीनशे शहान्नव) पेक्षा -३१ % कमी) लघुत्तम दर र.रू.४,७२,९२३/२४ या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२१३ विषय क्रमांक – २३
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.नरवि/कावि/तळवडे/१८/५१/२०१३दि.१९/९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

देहू रोड अँम्युनिशन डेपोभोवतीची २००० यार्डाची हद्द पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाढीव हद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेतील प्रस्तावांशी विसंगत होत आहे. चिखली, तळवडे या गावांव्यतिरिक्त मौजे निगडी, रावेत, किवळे, मामुर्डी यागावातील काही मिळकतींही रेड झोनमध्ये येत असल्याचे दिसून येत आहे. सदर रेड झोनने बाधित होणा-या क्षेत्रातील विकास परवानगीचे काम ठप्प झालेले आहे. सदर भागात मोठ्या प्रमाणात प्रतिनिर्बंधक क्षेत्रात यापूर्वीच बांधकामे झालेली आहेत. या सर्व बाबी वेळोवेळी संरक्षण विभागाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. तथापि संरक्षण विभागामार्फत यासंदर्भात ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. रेडझोन संदर्भात मे. इसेन असोसिएट्स (रिट पिटीशन क्रमांक ८९८५|२००९) व श्रीमती सीमा सावळे (रिट पिटीशन क्रमांक १८०६|२०११) या दोन याचिका मा.उच्च न्यायालयात दाखल आहेत. सदर दोन्ही याचिकांमध्ये महापालिकेने मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केलेली असली तरी महापालिकेची बाजू सक्षमपणे मांडण्यासाठी स्वतंत्र याचिका दाखल करणे गरजेचे होते. त्यामुळे तशी याचिका मनपामार्फत मा.उच्च न्यायालयात (रिट पिटीशन क्रमांक १९३५७|२०१३) दाखल करण्यात आलेली आहे. तरी याचिका दाखल करण्याच्या प्रस्तावास व याचिकेसाठी येणा-या खर्चास मा.महापालिका सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२१४ विषय क्रमांक – २४
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/०४/कावि/८४२/२०१३दि.२१/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मध्यवर्ती साहित्य भांडार विभागाकडील तातडीचे मागणीनुसार पुरवणी केस पेपर १५०० पॅड छपाई यापुर्वीचे निविदा कोटेशन नोटीस क्र.०१/२०१३-१४ अन्वये मे.स्वप्नील प्रिंटर्स, चिंचवड यांचेकडुन मंजुर दर र.रु.४५/- प्रती पॅड प्रमाणे र.रु.६७,५००/- चे प्रस्तुत कामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२१५ विषय क्रमांक – २५
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – लेखा
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.लेखा/१अ/कावि/७६९/२०१३दि.१७/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

लेखा विभागाकडे सध्या ठेकेदारामार्फत ३ संगणक चालक घेण्यात आले आहेत. त्याची मुदत दि. ३/०९/२०१३ रोजी संपलेली आहे. लेखा विभागातील असलेली कर्मचा-यांची संख्या, संगणक चालक पदाची आवश्यकता इत्यादी बाबी विचारात घेता लेखा विभागाकरीता ३ संगणक चालक कर्मचा-यांची आवश्यकता आहे. मे.शुभम उद्योग या संस्थेकडून दिनांक ३/११/१२ चे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार व दरमहा र.रु.७,६६३/- दरानुसार संगणकचालक पुरविण्यात आलेले आहेत. त्याच अटी/शर्ती व दरानुसार लेखा विभागाकरिता सन २०१३-१४ करीता ३ संगणक चालक १ वर्ष कालावधीसाठी दिनांक ५/९/२०१३ पासून नेमण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२१६ विषय क्रमांक – २६
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – क्रीडा
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- १)मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.क्रीडा/७/कावि/८१६/२०१३दि.३१/८/२०१३
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १९/९/२०१३ ठराव क्र.३०
विषय :- जलतरण तलाव पाणीशुध्दीकरण, परिसर स्वच्छता करणेबाबत..

विषय क्रमांक २६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२१७ विषय क्रमांक – २७

दिनांक – १/१०/२०१३ विभाग – क्रीडा

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.क्रीडा/४/कावि/२९३/२०१३दि.३/०९/२०१३

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १९/९/२०१३ ठराव क्र.३१

१) वैदुवस्ती व्यायामशाळा, पिंपळे गुरव, २) बळवंत चिंचवडे व्यायामशाळा, चिंचवड व ३) मुंजोबा चौक पिंपळे सौदागर व्यायामशाळा या व्यायामशाळा वगळता प्रस्तावात नमुद उर्वरित २८ व्यायाम शाळांना दि.०१ एप्रिल २०१३ ते ३० नोव्हेंबर २०१३ अखेर सेवाशुल्क देऊन म.न.पा. व्यायामशाळा कराराने चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२१८ विषय क्रमांक – २८

दिनांक – १/१०/२०१३ विभाग – क्रीडा

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.क्रीडा/४/कावि/२९८/२०१३दि.१०/९/२०१३

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १९/९/२०१३ ठराव क्र.३२ ची शिफारस विचारात घेवुन

नागरिक व विद्यार्थी खेळाडू यांचे सोयीचे दृष्टीने जास्तीत जास्त सराव करता यावा म्हणून म.न.पा.चे लॉन टेनिस कोर्ट, स्क्वॅश कोर्ट व बॅडमिंटन हॉल या क्रीडा सुविधांची १ ऑक्टोंबर २०१३ पासून साप्ता.सुट्टी रविवार ऐवजी शुक्रवार अशी करणेस व तशी दुरुस्ती ऑनलाईन बुकींग सेवेमध्ये करुन घेणेस तसेच मनपाचे बॅडमिंटन हॉल,टेनीस कोर्ट मैदाने या पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील परीसरातील नागरिकांनाच खेळासाठी देणेस व फक्त एक महिन्यासाठीच ऑनलाईन बुकींग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२१९ विषय क्रमांक – २९

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- १) मा.वसंत लोंढे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १९/९/२०१३ ठराव क्र.३३

मनपा ३१ वा वर्धापनदिन २०१३ अनुषंगाने सन्मा.सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांना चहा अल्पोपहार, बक्षिसे खरेदी, पंच मानधन, कॅप्स (टोपी) खरेदी, क्रीडा साहित्य खरेदी व स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या सन्मा.सदस्य, अधिकारी व कर्मचारी याकरीता ट्रॉफीज, बक्षिसे खरेदी, टी शर्ट, महिलांसाठी स्वेट शर्ट खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर छपाई तसेच क्रिकेट स्पर्धेच्या दिवशी उपस्थित अधिकारी, पदाधिकारी व नगरसदस्य, पत्रकार व कर्मचारी यांना द्यावयाचे भोजन इत्यादीकामी अंदाजे एकूण र.रु.३,२५,०००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरचा खर्च क्रीडा निधी, वार्षिक स्पर्धा क्रीडा कला या लेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२२० विषय क्रमांक – ३०

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- १) प्रभाकर वाघेरे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १९/९/२०१३ ठराव क्र.३७

विषय :- बॅडमिंटन हॉल तत्वावर चालविणेस देणेबाबत..

विषय क्रमांक ३० दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२२१ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- १) मा.वसंत लोंढे,मा.विमल काळे यांचा प्रस्ताव..

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १९/९/२०१३ ठराव क्र.४४

कोमल देशमुख हिची राष्ट्रीय सायकलिंग प्रशिक्षण शिबीर, नवी दिल्ली दि.२४ ऑगष्ट ते १३ सप्टेंबर २०१३ करीता निवड झाली असून अस्ताना (कझाकस्तान) येथे होणा-या ३४ व्या आशियाई सायकलिंग अजिंक्य स्पर्धेच्या तयारीसाठी सायकल व इतर क्रीडा साहित्य खरेदी करणेस तिला मनपा कडून आर्थिक सहाय्य रु.५०,०००/- मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२२२ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १/१०/२०१३ विभाग – अ प्रभाग पाणीपुरवठा

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.अप्र/पापु/कावि/८/१२७/२०१३दि.२४/९/२०१३

विषय :- तरतुद वर्गीकरणाबाबत..

विषय क्रमांक ३२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२२३ विषय क्रमांक – ३३

दिनांक – १/१०/२०१३ विभाग – वायसीएमएच

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वायसीएमएच/पी.जी १/कावि/६२९/२०१३दि.२५/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन

वायसीएमएच मधील प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या पदांसाठी दर्शविले प्रमाणे नियुक्त केलेले मानधनावरील कर्मचारी/अधिकारी केलेली विशेष बाब म्हणून दि. 08/10/2013 पासून पुढे 1 महिना कालावधीसाठी मुदतवाढ देणे ऐवजी तीन महिने कालावधीसाठी नेमण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२२४ विषय क्रमांक – ३४
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – जनता संपर्क व स्वागतकक्ष
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जा. क्र.जसं/६/कावि/६३४/२०१३दि.२५/०९/२०१३

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भगवान महावीर जयंती निमित्त शहरातील नागरिकांसाठी मंगळवार दि. २३ एप्रिल २०१३ रोजी अंकुशराव लांडगे नाटयगृह, भोसरी येथे "भजन संध्या भक्ती संगीत" आर्केस्ट्रा व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमांसाठी श्री.प्रदिप गेमावत यांचे आर्केस्ट्रा कार्यक्रमांचे मानधन, अंकुशराव लांडगे नाटयगृहाचे भाडे तसेच चहापान व्यवस्था इ.साठी एकुण र.रु. ७१,११०/- खर्च झाला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२२५ विषय क्रमांक – ३५
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – अ प्रभाग पाणीपुरवठा
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.अप्र/पापु/६/कावि/२८/२०१३दि.१९/९/२०१३
विषय :- स्पाईन रस्त्यावरील उड्डाणपुल बांधण्याचे कामाबाबत..

विषय क्रमांक ३५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२२६ विषय क्रमांक – ३६
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – ई-गव्हर्नन्स
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.ई-गव्हर्नन्स/३/कावि/५०७/२०१३दि.२५/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मा.श्री.एम.एन.राव डायरेक्टर ई-गव्हर्नन्स, सी जी जी हैद्राबाद यांच्या अर्बन ई- गव्हर्नन्स कार्यशाळेस उपस्थितीसाठी विमान प्रवास खर्च र.रु.९,१७२/- (अक्षरी र.रु.नऊ हजार एकशे बहात्तर फक्त) झालेला असून सदरचा खर्च संगणक अधिकारी यांनी अदा केलेला असल्याने सदरचा खर्च संगणक अधिकारी यांना अदा करणेस व खर्च ई-गव्हर्नन्स या लेखाशिर्षावरुन खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२२७ विषय क्रमांक – ३७
दिनांक – १/१०/२०१३ विभाग – नागरवस्ती विकास योजना
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- १) मा.सहाय्यक आयुक्त यांचे जा. क्र.नाविया/०४/कावि/१००/२०१३दि.११/०९/२०१३

२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २५/०९/२०१३ ठराव क्र.११

प्रपत्र अ नुसार पात्र लाभार्थीस आई व मुलगी यांचे संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये मुदत ठेव पावती स्वरुपात पहिल्या मुलीवर शस्त्रक्रीया करणा-या ३ लाभार्थीना प्रत्येकी र.रु.२५,०००/- प्रमाणे र.रू.७५०००/- (अक्षरी र.रु.पंच्च्याहत्तर हजार फक्त) व दोन मुलींवर शस्त्रक्रीया करणा-यांस ३८ लाभार्थीस प्रत्येकी

र.रु.१०,०००/- प्रमाणे र.रू.३,८०,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख ऐंशी हजार फक्त) असे एकुण र.रु.४,५५,००० (अक्षरी र.रु.चार लाख पंच्चावन्न हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कम अदा करणेस तसेच १ मुलीवर अथवा दोन मुलीवर शस्त्रक्रिया केलेल्या दांम्पत्यास अर्थसहाय्य देणेची योजना आहे या योजनेमध्ये ज्या लाभार्थींचे अर्ज अपात्र झाले आहेत अशा लाभार्थींनी कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर त्यांना देखील या योजनेचा लाभ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२२८ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १/१०/२०१३ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- १)मा.सहाय्यक आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/०४/कावि/११५/२०१३दि.२१/०९/२०१३

२)मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २५/०९/२०१३ ठराव क्र.१२

यशदातील पर्यावरण व विकास कैंद्रामार्फत कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार यांचा पर्यावरण नियोजन व प्रशासन प्रमाणिकरण कार्यक्रम ( Environment Planning and Administration Certificate Course ( Department of Personnel and Training Government of India) प्रशिक्षण कार्यक्रम दि.२१ ते २३ ऑगस्ट २०१३ दरम्यान आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणाकरीता यशदा यांनी त्यांचेकडील दि.१७/८/२०१३ चे पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील २२ महिला बचतगट समन्वयकांचे नामनिर्देशन करण्यात यावे असे पत्राद्वारे कळविले होते. दि.२०/८/२०१३ च्या मान्य प्रस्तावानुसार मा.अतिरिक्त आयुक्त यांनी यशदाकडील संदर्भीय पत्रावर २२-२४ लाभार्थी प्रशिक्षणासाठी जातील तेवढेच पैसे पाठवावेत असे शेरांकन नमुद केले आहे. सदर प्रशिक्षण कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार यांचेतर्फे पुरस्कृत असल्यामुळे या प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता नामनिर्देशित अधिका-यांना प्रतिदिन प्रतिप्रशिक्षणाकरीता र.रु.२००/- इतकी रक्कम ( तीन दिवसाकरिता र.रु. ६००/- प्रति प्रशिक्षणार्थी) यशदाकडे जमा करणे आवश्यक असल्याने सदर २४ प्रशिक्षणार्थींचे एकत्रीत र.रु. १४,४००/- (अक्षरी र.रु. चौदा हजार चारशे फक्त ) एवढी रक्कम अदा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२२९ विषय क्रमांक – ३९

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- १) मा.प्रतिभा भालेराव,मा.वनिता थोरात यांचा प्रस्ताव..

२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २५/०९/२०१३ ठराव क्र.१३

पवनाथडी जत्रा २/१/२०१४ ते ५/१/१४ या कालावधीत एच.ए.मैदान पिंपरी येथे आयोजित करणेबाबत व सदर जत्रेच्या आयोजनाकामी र.रु. ४० लाखपर्यंत खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२३० विषय क्रमांक – ४०
दिनांक – १/१०/२०१३
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- १) मा.प्रतिभा भालेराव,मा.वनिता थोरात यांचा प्रस्ताव..
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २५/०९/२०१३ ठराव क्र.१४
विषय :- आठवडा बाजाराचे आयोजन करणेबाबत..

विषय क्रमांक ४० दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>

ठराव क्रमांक – ४२३१ विषय क्रमांक – ४१
दिनांक – १/१०/२०१३
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.सुनिता वाघेरे,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

सन २०१३ – १४ चे अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुदीत वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. ( वाढ/घट र.रु. १२ लाख )

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२३२ विषय क्रमांक – ४२
दिनांक – १/१०/२०१३
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.शकुंतला धराडे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२३३ विषय क्रमांक – ४३
दिनांक – १/१०/२०१३
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.सुनिता वाघेरे,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील अ प्रभाग व अ मुख्यालयातील कामांच्या प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुदी मध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ५ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२३४ विषय क्रमांक – ४४

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.सुनिता वाघेरे,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

महानगरपालिकेच्या सन २०१२ – १३ चे अंदाजपत्रकामध्ये भोसरी स.नं.१ मधील मनपाच्या ताब्यात आलेली आरक्षणे विकसीत करणे या कामासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु.७५ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२३५ विषय क्रमांक – ४५

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.सुनिता वाघेरे,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

ब प्रभागाचे सन २०१३ – २०१४ चे मनपा अंदाजपत्रकात प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ घट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२३६ विषय क्रमांक – ४६

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.ई-गव्हर्नन्स/२/कावि/७७२/२०१३ दि.३०/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

सहाय्यक आयुक्त भुमि/जिंदगी व उपसंचालक, नगररचना यांनी सेतु समिती नांदेड यांचे प्रोजेक्ट मॅनेजर यांचेसाठी उपलब्ध करुन द्यावयाचे सदनिकेसाठी महापालिकेने सदर घरमालकाबरोबर करारनामा करावा असा अभिप्राय दिला असला तरी सेतू समिती नांदेड यांचे प्रोजेक्ट मॅनेजर श्री.अभिजित गोरे यांनी श्री.सुशील साने सदनिका मालक यांचेबरोबर केलेला करारनामा मान्य करुन त्यासाठी पुन्हा महापा लिकेने करारनामा न करता दिनांक १६/०६/२०१३ पासून ११ महिने कालावधीसाठी प्रतीमहा र.रु. ९०००/- याप्रमाणे घरभाडे श्री.सुशील साने यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२३७ विषय क्रमांक – ४७

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.सुनिता वाघेरे,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजामध्ये कामाच्या प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. ( वाढ/घट र.रु. १५ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२३८ विषय क्रमांक – ४८

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

ब प्रभागामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाज पत्रकामध्ये कामांच्या प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२३९ विषय क्रमांक – ४९

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.जसं/६/कावि/६४१/२०१३ दि.३०/०९/२०१३

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वेगवेगळया विकास कामांचा मा.उपमुख्यमंत्री यांनी केलेली पाहणी दौरा, वेगवेगळया ठिकाणी करण्यात आलेली अतिक्रमण कारवाई तसेच भंगार मालाची विक्री, सारथी हेल्पलाईन ट्रेनिंग व सारथी हेल्पलाईन उदघाटन इ.कार्यक्रमांचे व्हिडीओ शुटिंग मे.दर्शन डिजिटल व्हीडीओग्राफी,सांगवी पुणे २७ तसेच मे. त्रिमुर्ती फोटोस्टुडिओ आणि व्हिडीओ व्हिजन, भोसरी पुणे ३९ यांच्याकडुन (मे.रामा व्हिजन, थेरगाव यांच्याकडील जुन्या दराने) करुन घेण्यात आलेले आहे. त्याकरीता र.रु.३५,५००/- (अक्षरी र.रु. पसतीस हजार पाचशे फक्त) इतका खर्च आला असुन त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२४० विषय क्रमांक – ५०

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजामध्ये कामाच्या प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. ( वाढ/घट र.रु.२५.७५ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२४१ विषय क्रमांक – ५१

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/१/कावि/८२१/२०१३ दि.२०/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नवीन समुह संघटकांची नेमणुक होईपर्यंत सध्या विभागाकडे कार्यरत असलेल्या ९ समुहसंघटकांना दि.३०/०९/२०१३ रोजी मुदत संपल्यानंतर सेवा खंडीत करुन दि. ७.१०.२०१३ पासुन तीन महिने कालावधीकरीता किंवा नवीन नेमणुका होईपर्यंत मुदतवाढ देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२४२ विषय क्रमांक – ५२

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

महानगरपालिकेच्या सन २०१२ – १३ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र. ४१० दि.१०/०९/२०१३ अन्वये तरतुद वर्गीकरण करण्यात आले आहे. सदर ठरावात प्रस्तावात नमुद प्रमाणे दुरुस्ती सुचविणेत येत आहे. तरी सदरचा ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. (वाढ/घट र.रु. २३ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२४३ विषय क्रमांक – ५३

दिनांक – १/१०/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. काशा/१/कावि/१०४३/२०१३ दि.१/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.आवटे फॅब्रीकेटर्स & ऑटोमोबाईल वर्क्स यांना कमी करुन दिलेल्या दरानुसार मनपाच्या आरोग्य विभागाच्या वापराकरीता JNNURM अंतर्गत ८ टन क्षमतेचे ४ नग टिपर यंत्रणा करारनामा करुन खरेदी करणेस व त्याकामी प्रतिवाहन र.रु. २४,४८,१३८/- अंदाजपत्रकीय रकमेच्या ४.९८% जादा दर प्रमाणे एकुण चार वाहनांकरीता येणा-या र.रु. ९७,९२,५५२/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/ ९२३ /२०१३
दिनांक - ०४/१०/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.